ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICNECED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख २३ एप्रिल, १९५८ | अंक १७

## विविध माहिती

**विमानदळाचा रौप्यमहोत्सव**—भारताच्या विमानदळाच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त पोष्टाचीं दोन तिकिटें काढण्यांत येणार आहेत. एका तिकिटावर १९३३ सालीं प्रथम वापरण्यांत आलेल्या विमानाचें चित्र व दुसऱ्या तिकिटावर आज हवाई दलांत असलेल्या अद्यावत् जेट लढाऊ विमानाचे चित्र असेल. तिकिटें ३० एप्रिल रोजीं काढण्यांत येतील.

**कोलंबो बंदराचें राष्ट्रीयीकरण**—सीलोनच्या सरकारनें कोलंबो बंदराचें ता. १ जुलैपासून राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविलें आहे. ह्यासंबंधींचा कायदा प्रतिनिधि गृहांत मंजूर झालेलाच आहे. आतां तो सिनेटकडे धाडण्यांत येईल. श्री. बंदरनायके ह्यांच्या सरकारनें १ जानेवारी, १९५८ पासून सीलोनमधील बस वहातूक आपल्या ताब्यांत घेतली आहे.

**भारतामधील विकासयोजना**—ब्राझिलच्या नॅशनल डेव्हलपमेंट बँकेचे अध्यक्ष सध्यां भारतांत आले आहेत. वाहतुकीसारख्या सार्वजनिक उपयोगाच्या गोष्टींचा विकास करण्यासाठी भारताकडून जे प्रयत्न होत आहेत, त्यांचा ते अभ्यास करीत आहेत. ह्या बाबतींत दोन्ही देशांपुढील प्रश्न सारखे आहेत, असें त्यांचें मत आहे.

**आंतर-जातीय विवाह**—केरळ राज्यांत आंतर-जातीय विवाहाला उत्तेजन देण्यासाठीं लवकरच चळवळ सुरू करण्यांत येणार आहे. अखिल कोचीन मिश्र-विवाह संघटनेतर्फे हा उपक्रम सुरू करण्यांत येत आहे. अशा विवाहांनीं जातीयता कमी होण्यास मदत होईल, असें संघटनेच्या अध्यक्षांचें मत आहे.

**रेयॉनचा कारखाना**—सौराष्ट्रांत वेरावळ येथें रेयॉन तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्यासंबंधीं एका खाजगी कंपनीस परवाना देण्यांत आला असून, कंपनीच्या प्रतिनिधीनें वेरावळ म्युनिसिपालिटीशीं जरूर त्या वाटाघाटीहि केल्या आहेत. कारखान्यांत रोज ५ टन रेयॉन तयार होऊं शकेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**माकडांची निर्यात**—गेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत भारतानें माकडांची परदेशी निर्यात करून सुमारें ८६ लाख रुपयांची परदेशी हुंडणावळ मिळविली, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. ह्या कालांत शास्त्रीय संशोधनाकरतां १,२८,२६१ माकडें परदेशीं निर्यात करण्यांत आलीं.

**नगरचा पाणीपुरवठा**—अहमदनगरचा पाणीपुरवठा अधिक चांगला करण्यासाठीं जमिनीखालून पाण्याचे नळ घालण्यास सुरवात झाली आहे. म्युनिसिपालिटीनें बांधलेल्या नव्या पंपिंग स्टेशनचेंहि उद्घाटन करण्यांत आलें. पाणीपुरवठा चांगला करण्यासाठीं आखण्यांत आलेल्या योजनेला ४,७७,००० रुपये खर्च येणार आहे.

**शेतीच्या अर्थशास्त्रज्ञांची परिषद**—शेतीच्या अर्थशास्त्रज्ञांची आंतरराष्ट्रीय परिषद पहिल्यानेंच आशियांत भरणार आहे. भारत सरकारच्या विनंतीवरून परिषदेचें १० वें अधिवेशन ऑगस्ट अखेर म्हैसूर येथें भरविण्यांत येईल. निरनिराळ्या ७० देशांतून सुमारें ३०० प्रतिनिधी परिषदेला हजर राहतील, असा अंदाज आहे.

**बँकर्सचा अमेरिकेचा दौरा**—भारतामधील व्यापारी बँकांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ अमेरिकेंतील बँकांच्या व्यवहाराचा अभ्यास करण्यासाठी तिकडे जाणार आहे. मंडळांत १५ जण असतील. मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्याच्या अमेरिकन पद्धतीचा ते अभ्यास करणार आहेत.

**कामावर जाणाऱ्या स्त्रियांची सोय**—कामावर जाणाऱ्या स्त्रियांची सोय करण्यासाठी कलकत्त्याच्या ट्रॅम्वे कंपनीनें संध्याकाळीं गर्दीच्या वेळीं फक्त स्त्रियांसाठी खास गाड्या सोडण्याचें ठरविलें आहे. सकाळीं कामावर जातांना व संध्याकाळीं परत येणाऱ्या स्त्री-उतारूंची खूप संख्या असल्यामुळें ही व्यवस्था करण्यांत आली आहे.

**सरकारी नोकरांच्या राहणीची चौकशी**—दिल्लीमधील मध्यवर्ती सरकारच्या नोकरांच्या दैनंदिन जीवनाची पाहणी करण्यांत येणार आहे. ह्या नोकरांचें अंदाजपत्रक, खाणें-पिणें आणि त्यांचा रोजचा कार्यक्रम ह्याबद्दल माहिती मिळविणारें एक प्रश्नपत्रक तयार करण्यांत आलें आहे. तें सर्व खात्यांच्या नोकरांकडे पाठविण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# नवीन कंपनी कायद्याची दुरुस्ती

( लेखक:—श्री. नारायण विनायक भोंडे,
बी. ए., एलएल. बी., पुणें )

( २ )

### नातेवाईकांची व्याख्या

( ४ ) कंपनीच्या संचालकाचा नातेवाईक कंपनींत असल्यास व त्याचे नोकरीस सर्वसाधारण सभेची संमति तिनें न घेतल्यास संचालक तसा पदाधिकारी राहण्यास अपात्र ठरतो. कायद्यांतील ह्या नवीन तरतुदीनें तर धुमाकूळ उडविला आहे. कलम ६ मधील नातेवाईकांची व्याख्या इतकी व्यापक व दूरगामी आहे कीं, त्यामुळें कित्येक डायरेक्टरांना आपली जागा खालीच करावी लागेल. कलम २ ( ३ ), व ( ४ ), २९५, २९७, ३१४, ३५४ ते ३६० ह्या कलमांत नातेवाईकांचा उल्लेख असून नातेवाईकांचे कक्षेंत सुमारें ६७ किंवा कांहींच्या हिशेबाप्रमाणें ८१ व्यक्ति येतात. औरस, अनौरस, दत्तविधान, सावत्र नातेवाईक, सर्वसाधारण सभेच्या संमतीशिवाय नवीन नेमणें अगर जुने चालू ठेवणें निषिद्ध आहे. हें नियंत्रण कित्येक वेळां काटकसर, आत्मीयता व कार्यक्षमता ह्यांस बाधक ठरते. ज्याला लबाडी करावयाची तो दूरच्या नातेवाईकाच्या अगर जवळच्या मित्राच्या नांवानें बिनाभी व्यवहार करील. तशा स्थितींत हे निर्बंध सैल करणें व व्याख्या बदलणें आवश्यक आहे व म्हणून दुरुस्ती समितीनें असें सुचविलें आहे कीं, हिंदु एकत्र कुटुंबांतील घटक, नवराबायको, बाप–मुलगा–मुलगी, नात–नातू, चुलता–चुलती, पुतण्या–पुतणी, अशा संबंधितासच नातेवाईक धरावें; ह्या सारखींत इतर नातेवाईकांस गोवूं नये. समितीनें सुचविलेला हा फरक योग्य आहे, यांत शंका नाहीं. तरीहि तो अपुरा व असमाधानकारकच आहे. शिवाय नवीन व्याख्या खरोखर संदिग्ध व घोटाळ्याची ठरणार आहे. ह्यांपैकी कांहीं नातेवाईक अनौरस, दत्तक, सावत्र, असले तर पदाधिकाऱ्यांस अपात्रता चिकटेल काय, हा प्रश्न शिल्लक उरतोच. वारसा हक्काचा निर्णय जरी ह्यांत घेण्यांत येत नसला, तरी अपात्रता ठरवितांना नियंत्रक मंडळ, कोर्ट अगर मध्यवर्ती सरकार ह्यांस निर्णय घेतांना कोडेंच पडणार आहे.

### जिल्हा न्यायाधिशावरील अविश्वास काढून टाका

( ५ ) १९५६ च्या कंपनी कायद्याचे १० व्या कलमानें जिल्हा कोर्टाकडे असलेले अगर जिल्हा कोर्टाकडे सुपूर्त करतां येण्याजोगे अधिकार त्याजकडून अजिबात काढून घेतले आहेत. १९१३ सालाचे अगोदरपासून जे जिल्हा न्यायाधीश, जिल्ह्याचे वकील, कंपनी कामाची चौकशी करीत ती करण्यास त्यांना नवीन कायद्यानें अपात्र ठरविलें आहे. असा फरक करण्यास कोणतीहि भरपूर व योग्य कारणें दिलेली नाहींत. विद्यमान नवीन कायद्यानें कंपनी कारभाराची चौकशी ( कलम २३७ ), सावकार व सभासदांबरोबर करण्याचे तडजोडीचे अधिकार ( ३९१ ), कंपन्यांची पुनर्घटना व एकत्रीकरण ( ३९४ ), जाच व गैरकारभारास प्रतिबंध ( ३९७ ते ४०७ ) व एक लाख रुपये भरलेले भांडवलाच्या कंपन्यांची नादारींत काढण्याचीं प्रकरणें ( ४२५ ते ५६० ) यांची हुकमत केवळ हायकोर्टाकडे ठेविलेली आहे. १९१३ चे कायद्यानें सदर प्रकरणें चालविण्याची हुकमत व हक्क जिल्हा कोर्टाकडे सुपूर्त करतां येत होतीं व तशीं तीं केलींहि. पण नवीन कायद्यानें ह्या बाबतींतील जिल्हा कोर्टाचे अधिकार अजिबात काढून घेतले आहेत. जिल्हा कोर्टे, तेथील वकील, अशांना हीं कामें व जबाबदाऱ्या पेलणार नाहींत, त्या पार पाडण्यास ते नालायक आहेत, असा शिक्कामोर्तब नवीन कायद्यानें या सर्वांना मारला आहे. याचा सरळ अर्थ असा कीं, पुणें, अहमदाबाद, सोलापूर, जळगांव, वगैरे ठिकाणीं वरील कलमाखालील बाबी जर उद्भवल्या तर संबंधीं कंपन्यांचे चालक, कारभार पाहणार, व त्यांस विरोध करणारे, भागीदार, सावकार या सर्वांनीं आपले कागदपत्र, बाड, साक्षीदार, लवाजमा घेऊन मुंबई हायकोर्टांत जावें लागणार व राज्यांतील अनेक कंपन्यांच्या कामाचा ढीग ह्या राजधानीच्या जागीं पडणार. १९१३ चे कायद्यांत जें अधिकारांचें विकेंद्रीकरण होतें, जो श्रमविभाग होता, जी पात्रतेला मान्यता दर्शविली होती, ती सर्व योजना, १९५६ चे कायद्यानें रद्द केली ही चूक आहे. तरी पूर्वीप्रमाणेंच लायक जिल्हा कोर्टाचे अधिकार त्यांना पुनः परत करणें इष्ट व अगत्याचें आहे व त्यासाठीं कलम १० यांत फरक करणें अत्यावश्यक आहे. परंतु दुरुस्ती समितीनें या जिल्हाळ्याचे विकेंद्रीकरणाचे प्रश्नाकडे लक्ष दिलें नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे.

### संचालक–मंडळ

( ६ ) संचालकाची अपात्रता ठरविणें व त्यास जागा खाली करावयास लावणें, या बाबतींतहि समितीच्या सूचना चमत्कारिक आहेत. कलम २८३ ( १ ) अन्वयें जरूरीचे भाग धारण न करणें, वेडा व नादार होणें, भागांचे पैसे न भरणें, रजा न घेतां सारख्या तीन सभांस उपस्थित न होणें, आपले हितसंबंध न दर्शविणें, (२९९) वगैरे कारणांमुळें संचालकांस जागा रिकामी करावीच लागते. शिवाय कलम २८३ ( १ ) जी अन्वयें सहा महिन्यांपेक्षा जास्त सजा भारतांतील कोर्टानें दिल्यास तो संचालक जागा खाली करतो. परंतु समितीची नवीन दुरुस्ती अशी आहे कीं, भारताशिवाय कोणत्याहि कोर्टानें नैतिक अधःपाताच्या गुन्ह्याबद्दल सहा महिन्यांची शिक्षा संचालकास दिल्यास अगर प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें त्यानें कर्ज घेतल्यास अगर जामीन राहिल्यास संचालकाची जागा आपोआप रिकामी झाली असें समजावें. ही दुरुस्ती अनावश्यकच नव्हे तर ती जाचक ठरणार आहे. १९१३ चे कायद्यांत व इंग्रजी कायद्यांत अशी शिक्षा संचालकांस अपात्र ठरवीत नाहीं. शिवाय पोर्तुगीज अगर पाकिस्तानचे मॅजिस्ट्रेटनीं एखाद्या हिंदवासीयांस सजा केली तर ती आमच्या कोर्टानें व कंपन्यांनीं कां मानावी ? ब्रिटिश अमदानींत परकीय कोर्टाच्या निकालांना स्वच्छ व सरळ मान्यता नाकारली. परदेशी कोर्टाचे निवाड्याची बजावणी अन्योन्य कराराशिवाय होत नाहीं. मग भारतीय कंपन्यांनीं परकीय कोर्टाचे निवाडे काय म्हणून सर्वस्वीं ग्राह्य मानावे ? शिवाय, गुन्ह्यांत नैतिक अधःपात आहे हें केव्हां, कसें व कोणीं ठरवावें ? हा निर्णय घेण्यास विचार व वेळ लागणार. तेव्हां तात्काळ व आपोआप संचालकानें जागा खाली करणें अथवा होणें हें अशक्य, अव्यवहार्य, निदान अवघड तरी आहे. तसेंच राजरोस कर्ज घेणारास तुम्ही शिक्षा द्या. पण कर्ज अप्रत्यक्ष कोणी व कसें घेतलें हें शोधून काढणें अवघड आहे. अमुक गोष्ट झाल्याबरोबर आपोआप जागा खाली करणें, व गोष्ट सिद्ध झाल्याचें ठरविणें, हें अन्योन्यविरुद्ध होय. बरें, हा निर्णय घेण्यास विलंब लागल्यास मधल्या वेळांतील कृत्यें गैरकायदा ठरणार व मुशाहिरा परत करण्याची पाळी संबंधी संचालकांवर येणार. तेव्हां ह्या सर्वच बाबी कंपन्यांस व संचालक मंडळास हितावह नाहींत व कारभाराच्या प्रतिष्ठेस पोषक नाहींत.

# अर्थ

बुधवार, ता. २३ एप्रिल, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## केरळमधील काजूंचे कारखाने

भारताला दुर्मिळ असें डॉलर्सचें चलन मिळवून देणारे काजूंचे कारखाने केरळ राज्यांत आहेत. ह्या कारखान्यांचा विषम विकास घडूं न देण्याच्या हेतूनें भारत सरकारचा इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट अँड रेग्युलेशन ॲक्ट त्यांना लागूं करण्यांत येणार आहे. केरळ राज्याचे उद्योगमंत्री श्री. गोपालन् ह्यांनीं ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक त्रिपक्षीय परिषद् भरविली होती. तिनें हा निर्णय एकमुखानें घेतला आहे. ह्या धंद्यासाठीं कॉर्पोरेशन स्थापन करणें कितपत शक्य आहे, त्याचाहि परिषदेंत विचार करण्यांत आला. परिषदेला कारखानदार आणि कामगार ह्या दोन्ही पक्षांचे प्रतिनिधी हजर होते. ह्या धंद्यामुळें भारताला दरसाल १४ कोटी रुपयांची परदेशीय हुंडणावळ प्राप्त होते. राज्यांत काजूंचे १७१ कारखाने आहेत व सर्वांत मिळून जवळजवळ ५९,००० कामगार राबत आहेत. त्याशिवाय पर्यवेक्षक व कारकून ह्यांची संख्या वेगळी आहे. कारखान्यांसाठीं २,००,००० टन काजूबिया दरसाल लागतात. गेल्या सालीं ह्यापैकी ९३,००० टन बिया आफ्रिकेंतून आयात करण्यांत आल्या. धंद्याला लागणारा कच्चा माल देशांतच तयार होणें जरूर आहे. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत आणखी १३,००० एकर जमिनींत काजूंची लागवड करण्याचें ठरलें आहे.

---

## अमेरिकेंतील मंदीचा पाकिस्तानवर परिणाम

अमेरिकेंतील आर्थिक मंदीचा परिणाम पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर झाला आहे, असें पाकिस्तानचे अर्थमंत्री श्री. अमजाद अल्ली ह्यांनीं जाहीर केलें आहे. पाकिस्तानांतील रेल्वेच्या मालधक्यावर कापसाचे गठ्ठे तुंबून राहूं लागले आहेत. कापूस हा पाकिस्तानच्या निर्यातीच्या मालापैकीं एक महत्त्वाचा माल आहे. अमेरिकेंतील मंदीमुळें कापसाची किंमत घटली आहे त्यामुळें त्याची निर्यातहि घटूं लागली आहे. अशा रीतीनें तुंबून राहिलेल्या कापसाची किंमत २,००,००,००० डॉलर्स असावी. त्याशिवाय निर्यातीच्या इतर मालाच्या किंमतीहि घटल्या आहेत. पडत्या किंमतीच्या परिणामामुळें पाकिस्तानला सुमारें ३,००,००,००० डॉलर्सचें नुकसान सोसावें लागणार आहे. कापसाप्रमाणेंच सुताच्या विक्रींतहि घट झालेली आहे. हाँगकाँग येथील व्यापाऱ्यांच्या द्वारां पाकिस्तान दरमहा १५,००,००० डॉलर्सचें सूत निर्यात करीत असे. हाँगकाँगमधील व्यापारी तें ब्रिटनकडे व इतर युरोपिअन देशांकडे पाठवितात. आतां दरमहा अवघ्या २,००,००० डॉलर्स किंमतीच्या सुताचीच विक्री होते. युरोपमधील कापडाच्या गिरण्या मंदीच्या वातावरणामुळें सावधगिरी म्हणून कमी खरेदी करीत आहेत. त्याचा हा परिणाम आहे. पाकिस्तानमधील तागाच्या निर्यातींत फारसा फरक झालेला नाहीं. तरीपण त्याच्याहि किंमती उतरण्याचीं चिन्हें दिसत आहेत. इंडोनेशिआंतील अस्वस्थतेचाहि थोडाबहुत परिणाम झाला आहे. पाकिस्तानच्या कापसापासून बनविलेलें जपानी कापड इंडोनेशिआंत खपतें. पण, आतां जपानच्या विक्रींतच घट झालेली आहे.

## ब्रिटनमधील वाढतीं हिंदी रेस्टॉरंट्स

लंडनमधील डेली टेलिग्राफच्या स्वयंपाकासंबंधींच्या तज्ज्ञानें शहरांतील भारतीय व पाकिस्तानी पद्धतीच्या रेस्टॉरंट्सची माहिती गोळा करून प्रसिद्ध केली आहे. लंडन शहरांत अशीं सुमारें १५० रेस्टॉरंट्स आहेत, आणि त्यांच्या संख्येंत दरमहा दोन–तीन नव्यांची भर पडत आहे. ह्या तज्ज्ञानें ‘ब्रिटनमध्यें हिंदी रेस्टॉरंट्सनीं बसविलेला जम’ ह्या विषयासंबंधीं एक लेख प्रसिद्ध केला आहे. पाकिस्तानी व भारतीय पद्धतीच्या रेस्टॉरंट्सची लोकप्रियता कशामुळें वाढीस लागली आहे असा प्रश्न करून लेखक म्हणतो कीं, ह्या दुकानांतून मिळणाऱ्या चविष्ट खाद्यपदार्थांमुळें त्यांना लोकप्रियता लाभली आहे, असें नव्हे. हिंदुस्थानांत ज्या ब्रिटिश नागरिकांनीं आपल्या हयातींपैकी मोठा काळ घालवला त्यांना आपल्या पूर्वीच्या स्मृतींना उजळा देणें आकर्षक वाटतें. त्यामुळें ते आपल्या नातेवाइकांच्या व नातलगांच्यासह ह्या रेस्टॉरंट्सना उदार आश्रय देतात. शिवाय ह्या रेस्टॉरंट्समधील खाद्यपदार्थांसाठी द्यावा लागणारा आकारहि माफक असतो. त्यामुळें गिऱ्हाइकांच्या पैशाच्या पाकिटाला येथें येणें झेपतें. हिंदी स्वयंपाकपद्धतींत निरनिराळ्या प्रकारचे मसाले वापरण्याची पद्धत आहे. शिवाय, अनेक प्रकारचे मसाले योग्य प्रमाणांत वापरून स्वाद वाढविण्याची कुशलताहि ह्या पद्धतींत आहे. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन हिंदी पद्धतीचीं भोजनगृहें अधिकाधिक लोकप्रिय होत चाललीं आहेत.

---

## मानसिक धक्क्याबद्दल नुकसानभरपाई

गेल्या जानेवारीमध्यें इगतपुरीजवळ कलकत्ता मेलला अपघात झाला. अपघातांत जायबंदी झालेल्यांना नुकसानभरपाई देण्याचें काम मध्यरेल्वेच्या क्लेम्स–कमिशनरपुढें चालू आहे. नुकसानभरपाईसाठीं जे अर्ज आले, त्यांत बुलढाण्याच्या श्रीमती मालतीबाई गाडगीळ ह्यांचा एक अर्ज होता. ह्या बाईंना अपघातांत कांहीं किरकोळ जखमा झाल्याच. पण त्याशिवाय त्यांना जबरदस्त मानसिक धक्काहि बसला. त्यांचें म्हणणें असें कीं, अजूनहि महिन्या–पंधरा दिवसांनीं त्यांच्यापुढें अपघाताचें चित्र उभें रहातें आणि त्यांना मूर्च्छा येते. म्हणून त्यांना नुकसानभरपाई मिळावी. ह्या बाबतींत इंडियन रेल्वेज ॲक्टमध्यें जे नियम आहेत, त्याला धरून नुकसानभरपाई देतां येईल कां नाहीं असा मुद्दा कमिशनरपुढें आला. अपघातांत सांपडलेल्या व्यक्तीला झालेली दुखापत अशा स्वरूपाची असली पाहिजे कीं तीमुळें त्या व्यक्तीला आपलें काम करण्यास तात्पुरती अगर कायमची अपात्रता आली पाहिजे असा नियम आहे. ह्या नियमाचा अर्थ लावतांना कमिशनरनीं असें मत व्यक्त केलें कीं मानसिक धक्क्यामुळें न दिसणारी अशा प्रकारची दुखापत झालेली असेल तर तिचाहि समावेश ‘दुखापत’ ह्या सदरांतच केला पाहिजे. प्रस्तुत प्रकरणांत जो मानसिक धक्का अर्जदाराला बसला आहे तो अपघातामुळेंच बसला आहे. अर्थातच अर्जदाराला अपंग बनविणाऱ्या शारीरिक जखमा झालेल्या नसल्या, तरी त्याचा नुकसानभरपाईचा अर्ज मंजूर केला पाहिजे.

## महाराष्ट्र विभागीय सहकारी परिषद्

महाराष्ट्र डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह बोर्डाच्या विद्यमानें, अहमदनगर येथें, दि. २७ व २८ एप्रिल १९५८ रोजीं, महाराष्ट्र विभागीय सहकारी परिषदेचें दुसरें अधिवेशन भरविण्यांत येणार आहे. त्या अधिवेशनाचें उद्घाटन, नामदार डॉ. पंजाबराव देशमुख, भारतीय गणराज्याचे सहकार मंत्री, यांचे हस्तें होणार आहे. माननीय श्री. भाऊसाहेब हिरे, माजी महसूलमंत्री, मुंबई राज्य यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें मान्य केलें आहे.

भारतांतील सहकारी चळवळीमार्फत निरनिराळे ,राष्ट्रीय विकासाचे कार्यक्रम हातीं घेण्यांत येत असून त्यांत निरनिराळ्या अडचणी निर्माण होत आहेत. त्यासंबंधींचा विचार एकत्र येऊन करणें व त्यावर अनुभवसिद्ध अशी उपाययोजना सुचविणें आवश्यक आहे.

वरील बाब लक्षांत घेऊन महाराष्ट्र विभागीय सहकारी बोर्डाच्या कार्यक्षेत्रांतील निरनिराळ्या १२ जिल्ह्यांतील सहकारी संस्था, मार्केट-कमिट्या, सेंट्रल बँका, अर्बन बँका, सहकारी साखर कारखाने, वगैरे संस्थांचे सहकारी कार्यकर्ते अहमदनगर येथें जमणार असून द्वितीय पंचवार्षिक योजनेंत नमूद केल्याप्रमाणें सहकारी चळवळीचा पाया मजबूत करण्याचे दृष्टीनें ही परिषद परिणामकारक होईल, असा आम्हांस दृढविश्वास आहे.

या परिषदेच्या कार्यास जोमानें सुरुवात झाली असून त्यांत अहमदनगर जिल्हा सहकारी बोर्ड व महाराष्ट्र डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह बोर्डाचे कार्यकर्ते सातत्यानें प्रयत्न करीत आहेत.

ह्या परिषदेस प्रामुख्यानें शेतकी कर्जपुरवठा, नागरी कर्जपुरवठा, मार्केटिंग प्रक्रिया, सहकारी शिक्षण व प्रचार, सहकारी कायद्यांतील सुधारणा, वगैरे प्रमुख बाबींसंबंधीं विचारविनिमय होणार आहे.

हें अधिवेशन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रांगणांत (अहमदनगर) रविवार दि. २७ व सोमवार दि. २८ एप्रिल १९५८ रोजीं होणार असून तेथेंच प्रतिनिधींच्या निवासस्थानाची व्यवस्था करण्यांत आली आहे. वरील दोन दिवशीं सहकारी चळवळींवर आधारलेली, श्री. राम पाठाडेकृत 'अवघा धरूं सुपंथ' व श्री. पु. ल. देशपांडेकृत 'अंमलदार' हीं नाटकें होणार आहेत.

ह्या परिषदेस सुमारें १५०० प्रतिनिधी महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतून हजर राहणार आहेत. हें अधिवेशन महाराष्ट्र डिव्हिजनल को-ऑपरेटिव्ह बोर्डाच्या इतिहासांत चिरस्मरणीय ठरेल असा आम्हांस भरंवसा आहे.

रा. धों. अभ्यंकर
ऑ. सेक्रेटरी
म. डि. को. बोर्ड लि., पुणें १.

### तुमचें स्थान कोणतें ?

(लेखक :—श्री. वा. काळे. किंमत : २ रुपये)

सामाजिक व कौटुंबिक गुंतागुंतीमध्यें आपण कोणती भूमिका पत्करली पाहिजे व तीं यशस्वितेनें कशी पार पाडली पाहिजे, यासंबंधीं तात्त्विक दृष्टीनें व्यवहारज्ञान शिकविण्याचा सोपा प्रयत्न श्री. काळे यांनीं या लेखसंग्रहांत चांगल्या प्रकारें केला आहे. किर्लोस्कर, स्त्री व इतर मासिकांतून व नियतकालिकांतून हे लेख यापूर्वीच प्रसिद्ध झाले होते. पुस्तकरूपानें पुनः वाचकांपुढें आलेले हे लेख होतकरू संसारी तरुण-तरुणींना मार्गदर्शक ठरतील.

—'स्त्री', एप्रिल, १९५८

**मोटारीचा जळणाचा खर्च**—कानपूरमधील श्री. माथूर नांवाच्या गृहस्थानें एक युक्ति शोधली असून त्या योगानें मोटारीला जास्तींत जास्त २०० मैल वेग घेतां येईल असा त्याचा दावा आहे. त्याच्या ह्या युक्तीनें मोटारीला पेट्रोलहि कमी लागेल. प्रत्येक १०० मैलांस अवघा ४० नये पैसे खर्च येईल. त्यानें आपली यांत्रिक युक्ति भारत सरकारकडे पाठविली आहे.

**अणुस्फोटाची भीति**—पॅसिफिक महासागरांत अमेरिका करणार असणाऱ्या अणुस्फोटांविरुद्ध कलकत्त्यामधील एका नागरिकानें कायद्याचा आश्रय केला आहे. त्यानें पोलिस मॅजिस्ट्रेटकडे असा अर्ज केला आहे कीं, मॅजिस्ट्रेटनें अमेरिका व इंग्लंड ह्यांच्या सरकारांना स्फोट करण्याची बंदी करावी. मॅजिस्ट्रेटनें आपल्याला तसा अधिकार नसल्याचें सांगितलें.

**ब्रिटनच्या अर्थखात्याची आशा**—ब्रिटनच्या अर्थखात्यानें आपला वार्षिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, गेल्या वीस वर्षांत ब्रिटनमध्यें वाढत्या किंमतींनीं बराच त्रास दिलेला आहे. तथापि, १९५८ सालीं ह्या किंमतींना आळा घालण्याच्या कामीं यश येण्याचा चांगला संभव आहे.

**सिलोनला भारताच्या विड्या**—सिलोनला लागणाऱ्या सर्व विड्या भारताकडून पुरविल्या जातात. गेल्या वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत भारतानें सीलोनला १८,१९,००० पौंड विड्या पाठविल्या. त्यांची किंमत ८३,८६,४०० रुपये झाली. १९५६ सालीं सीलोननें भारताकडून १,२३,७३,३०० रुपयांच्या व १९५५ सालीं सुमारें १,०९,१७,६०० रुपये किंमतीच्या विड्या घेतल्या होत्या.


# बँक ऑफ पूना, लिमिटेड

**—शेड्यूल्ड बँक—**

ठेवीदार व खातेदार ह्यांनीं ठेवीच्या रूपानें ठेवलेल्या पैशांतूनच बँकेच्या प्राप्तींत वाढ होत असते. त्यांना त्याचा योग्य तो मोबदला मिळणें जरूर आहे.
बँकेच्या वाढत्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

—व्याजाचे दर—

चालू खातें : अर्धा टक्का, सेव्हिंग्ज खातें : २॥ टक्के.
मुदत ठेव तीन ते बारा महिने : ४ टक्के.
तीन महिन्यांपेक्षां कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

★ आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवींमधून पैसा परत घेतांना कितीहि रक्कम काढावयाची असली तरी पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

चौकशी—(१) ४५५ रविवार पेठ, (२) ३६१ सदाशिव पेठ, (३) डेक्कन जिमखाना, पुणें. (४) सांगली.

गो. गं. साठे — मॅनेजर
डी. आर. नाईक — चेअरमन

## भारतांतील नियोजनाचें तंत्र

भारतांतील नियोजन मंडळाच्या, अर्थशास्त्रज्ञांच्या उपमंडळाचे एक प्रमुख सभासद प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं, नुकत्याच स्थापन झालेल्या अहमदाबाद येथील "लास्की इन्स्टिटयूट ऑफ पोलिटिकल सायन्स" मध्यें दि. २४ मार्च रोजीं दिलेल्या आपल्या व्याख्यानांत पुढील विचार व्यक्त केले :—

"भारतांतील नियोजन मंडळ आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचे दृष्टीनें संपूर्णपणें अयशस्वी ठरलें आहे. त्या मंडळाच्या पुनरुज्जीवनाची जरूरी आहे. विशेषतः भारताचे महामंत्रि व अर्थमंत्रि यांचें नियोजन मंडळांतील सभासदत्व कमी करून स्वतंत्र व कर्तबगार अशा होतकरू व्यक्तींना त्यांत प्रवेश व्हावयास पाहिजे. त्याशिवाय नियोजन मंडळ अधिक कार्यक्षम होऊं शकणार नाहीं."

या संदर्भांत, श्री. एन्. बी. सप्रे यांनीं एका पुस्तक रूपानें पूर्वीच मांडलेले विचार वाचकांना उद्बोधक होतील असें वाटल्यावरून त्यांच्या "द्वी टेक्निक ऑफ प्लॅनिंग इन् इंडिया" (पृष्ठसंख्या : १७१, किंमत : ३ रु. ८ आ.) या ग्रंथांतील विवेचन येथें थोडक्यांत दिलें आहे. मूळ ग्रंथ आटोपशीर असून सामान्य वाचकांनाहि समजेल अशा सोप्या भाषेंत तो लिहिलेला आहे.

### नियोजनाची उभारणी

आर्थिक नियोजनाला सर्वसाधारण कोणाचाच विरोध नाहीं. निरनिराळ्या देशांतून यासंबंधीं प्रचारहि इतक्या मोठ्या प्रमाणांत चालूं आहे कीं, सामान्य मनुष्यालाहि नियोजनाची ओळख असल्याचें आढळून येईल. तऱ्हेतऱ्हेनें या विषयावर विचार व्यक्त केले जात आहेत.

"नियोजनाचें तंत्र" या ग्रंथामध्यें नियोजनाच्या तंत्राचाच विचार मांडण्याचें लेखकानें योजलें आहे. त्यांतहि नियोजनाच्या उभारणीचें शास्त्र स्पष्ट करण्याचा लेखकाचा मानस आहे. हें विवेचन मुख्यत्वें भारतांतील नियोजनाच्या अनुरोधानें केलेलें आहे. विवेचनाच्या स्पष्टीकरणाकरितां ग्रेटब्रिटन व रशिया या दोन देशांतील नियोजनाचा उल्लेख केलेला आहे.

आपल्या देशांतील नियोजनचा इतिहास पाहूं गेलें असतां प्रथम कै. श्री. सुभाषचंद्र बोस यांचा उल्लेख करावा लागेल. यानंतर भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं काम करणाऱ्या राष्ट्रीय नियोजन मंडळाचें कार्य व सरतेशेवटीं यांच्या सल्ल्यानें काम करणाऱ्या विविध कमिट्यांचें आर्थिक परिस्थितीच्या पहाणीचें काम फारच महत्त्वाचें समजावें लागेल. या पहाणीच्या अहवालांचा प्रत्यक्ष योजनेच्या उभारणीला फारच उपयोग झाला आहे.

### भारतांतील नियोजनाचा इतिहास

दुसऱ्या महायुद्धाचे काळांत व त्यानंतर आपल्या देशांत निरनिराळ्या स्वरूपाच्या योजना जाहीर करण्यांत आल्या. त्यामध्यें भांडवलदारांच्या वतीनें मांडलेला 'बॉम्बे प्लॅन', कामगारांच्या पुढाऱ्यांनीं मांडलेला 'पीपल्स प्लॅन' व महात्मा गांधींनीं मांडलेला 'गांधीयन प्लॅन' हे ठळक होत. तरीदेखील या तीन बाजूंनीं भिन्न रूपाच्या योजनांचें अंतरंग सारखेंच असल्याचें आढळेल.

इ. स. १९४५ मध्यें नियोजन सल्लागार मंडळानें, नियोजनाचें स्वरूप आणखी स्पष्ट करून मांडलें व त्यामुळें नियोजनांतील शक्याशक्यतेचा विचार स्पष्ट झाला व शिवाय त्यांतील अडचणींचा उलगडा होऊन धोरणाचा बोध होऊं लागला.

यानंतरची 'अधिक धान्य पिकवा'ची मोहीम तसेंच शेतीच्या आमूलाग्र सुधारणेकरितां सुरू झालेल्या दीर्घ मुदतीच्या योजना वगैरेंमुळें नियोजनाची दिशा स्पष्ट होत गेली. उद्योगधंद्याला व व्यापाराला विकासासाठी संरक्षणाची जरूरी आहे हें पण ध्यानांत आलें. याचवेळीं मजूरमंत्रि अधिवेशनास श्री. जगजीवनराम यांनीं एक पंचवार्षिक योजना सादर केली. त्यांत कामगारांच्या हितसंरक्षणाला प्राधान्य दिलेलें होतें. श्री. असफअली यांनींहि नियोजनांत दळणवळणांच्या सोयींचें महत्त्व फार आहे, असे विचार मांडले होते.

इ. स. १९४९ मध्यें वरील सर्व विचारांच्या अनुरोधानें पंचवार्षिक योजनेची मांडणी करण्यांत आली. अर्थात् राजकीय स्थित्यंतराचा यांत विचार केलेला होता. याचेंच अखेरचें स्वरूप म्हणजेच भारताची पहिली पंचवार्षिक योजना होय.

भारतांतील पहिल्या पंचवार्षिक योजनेपूर्वी नियोजनासंबंधीं जे विचार मांडण्यांत आले, त्यांत पुढील मुद्यांवर एकमत आढळतें :—

(१) नियोजनाला मध्यवर्ती नियामक मंडळ हवें.
(२) नियोजनांतील महत्त्वांचीं उद्दिष्टें.
(३) संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार.
(४) अग्रस्थानांचा विचार.

वरील सर्व प्रकारच्या मांडणींत मुख्य दोन दोष आढळतात :

(१) योजनेच्या काळांतील स्थित्यंतरांच्याकडे केलेलें दुर्लक्ष,

(२) अनिश्चित आकडेवारीवर जमवाजमव करण्याच्या प्रयत्नामुळें निर्माण झालेला गोंधळ.

### आपल्या योजनेंतील गृहीत गोष्टी

(१) जागतिक शांतता

(२) भारतांतील योजनेचें, संघराज्यात्मक राज्यपद्धतीमुळें निर्माण होणारें वैशिष्टय

(३) जबाबदार लोकशाहीचें अस्तित्व

(४) सर्वव्यापी व समतोल प्रगतीचें ध्येय

(५) कॉंग्रेस पक्षाची अखंड व दीर्घकाल चालू राहणारी सत्ता

(६) ही योजना म्हणजे भविष्यकाळांतील योजनांची निव्वळ प्रस्तावना आहे.

### मध्यवर्ती नियामक मंडळ

कुठेंहि नियोजन सुरू करतांना प्रथम मध्यवर्ती नियामक मंडळ स्थापन करणें अगत्याचें आहे. अर्थात् या मंडळाचें कार्य सर्वव्यापी स्वरूपाचें असलें पाहिजे व त्यांत एकसूत्रता असावी म्हणून योजनेच्या अंमलबजावणीला प्राधान्य आहे. अंमलबजावणी कडक व्हावयास पाहिजे. हें काम सरकारनें करणें इष्ट होय. कारण सरकार हीच संस्था इतर कोणत्याहि संस्थेपेक्षा अधिक उदारपणें व कमींत कमी संकुचित वृत्तीनें ही जबाबदारी पार पाडूं शकेल. अर्थात् यामध्यें एक मोठा धोका आहे. कित्येक वेळां राजकीय व आर्थिक सत्ता केंद्रित होऊन यांतूनच देशांत नियोजनाचे नांवाखालीं हुकुमशाही निर्माण होते. या ठिकाणीं लोकशाही पद्धतीची राज्यव्यवस्था असेल तर हा धोका संभवत नाहीं. कारण यामध्यें नियोजन मंडळाचें स्वरूप फक्त सल्लागार मंडळासारखें राहतें. ग्रेट ब्रिटनमध्यें नियामक मंडळ व पार्लमेंट

यांच्यांत अलगपणा असल्यामुळें तेथें हुकुमशाहीची परिस्थिति कधींच येऊं शकली नाहीं.

ग्रेट ब्रिटनमध्यें नियामक मंडळाला प्रगत किंवा गतिमान अशा आर्थिक धारणेचा फायदा घेतां येतो व त्यांचें कार्य आर्थिक उद्दिष्टापुरतेंच मर्यादित असतें. रशिआंतील परिस्थिति यापेक्षा वेगळी आहे. आर्थिक नियोजनाबरोबर नव्या समाजरचनेचेंहि कार्य त्याला करावयाचें आहे, आणि म्हणूनच त्याच्या दृष्टीनें राजकीय सत्ता व आर्थिक सत्ता एकत्रित असणें जरूर आहे. भारतांत ही सांगड अप्रत्यक्षपणें व आपोआप घातली गेली आहे. काँग्रेस हा एक देशव्यापी राजकीय लोकप्रिय पक्ष आहे व नियामक मंडळांत त्यांचेच प्रतिनिधी आहेत.

भारतांतील आर्थिक नियोजन-अधिकारी व मंत्रिमंडळ यांची एकजूट झालेली आहे, त्यामुळें ग्रेट ब्रिटनप्रमाणें राजकीय व आर्थिक व्यवस्थेंतील अलगपणा येथें अस्तित्वांत नाहीं.

### आपल्या योजनेंतील अडचणी

(१) निश्चित माहितीचा अभाव.
(२) संख्याशास्त्रज्ञांचा तुटवडा.
(३) तज्ज्ञांचा सल्ला व्यवहार्य नसण्याची शक्यता.

यांतून मार्ग काढण्यासाठी नियामक मंडळाला निरनिराळ्या संस्थांच्या प्रतिनिधींचें सहकार्य लाभलें पाहिजे.

याशिवाय योजनेच्या अंमलबजावणींत येणाऱ्या अडचणींचाहि विचार करावा लागतो. तसेंच आपली योजना लोकप्रिय आहे किंवा नाहीं हें पण दक्षतापूर्वक पहावें लागतें.

सगळ्यांत प्रमुख गोष्ट म्हणजे योजनेचीं उद्दिष्टें निश्चित ठरविलीं पाहिजेत. यावरच योजनेचा सांगाडा तयार होतो. बहुतेक सर्व योजनांचा हेतु आर्थिक समृद्धि व लोकांचें कल्याण हा असतोच. तसेंच योजनेचीं उद्दिष्टें नक्की करतांना सांस्कृतिक व राजकीय उद्दिष्टांचा विचार करून त्यांचेशीं मेळ घालावाच लागतो. विशेषतः राजकीय सत्ता आपल्या हातांत ठेवण्याकरितां राजकीय क्षेत्रांतील महत्त्वाच्या वर्गांना संतुष्ट ठेवण्याचेंहि काम योजनेचें मांडणींत विसरून चालतां येत नाहीं.

जुन्या सगळ्या योजनांमध्यें कमींत कमी गरजापूर्तींची शक्याशक्यता विचारांत घेतलेली होती. काँग्रेस पक्षानें, विशेषतः नियामक मंडळानें यापुढें जाऊन योजनेच्या उद्दिष्टांचा अधिक स्पष्टपणा मांडलेला आहे. येथें उद्दिष्टांचा क्रम ठरवितांना फार पंचाईत पडते. खरें म्हणजे समाजधारणेंतच आमूलाग्र बदल झाला पाहिजे; तरच भविष्यकाळीं आर्थिक प्रगति चांगली होईल. पण असा आमूलाग्र बदल फार वेगानें होऊं शकत नाहीं. त्याची गति फार मंद असते. याकरितांच योजना अखंडपणें, दीर्घकाल, चालवणें इष्ट. रशियासारख्या देशांत आर्थिक व राजकीय सत्तेचें केंद्रीकरण असल्यामुळें हें सातत्य सहजसुलभ आहे. भारतांत त्याची शक्यता कमी आहे.

### ध्येयनिश्चिती व अग्रस्थानांचा विचार

व्यक्तीच्या बाबतींत घरगुती खर्चाचें स्वरूप बऱ्याच प्रमाणांत लवचिक असते. त्यामानानें सरकारच्या खर्चाचें स्वरूप तितकेंसें लवचिक नसतें. कारभारविषयक खर्च व संरक्षणाकरिताचे खर्च न टाळतां येण्याजोगे आहेत. विशेषतः सद्यःस्थितींत ह्या प्रकारचे खर्च कमी न होता वाढतेच आहेत. हे खर्च अटळच मानावे लागतात. त्यामुळें कांहींवेळा आर्थिक प्रगतीच्या खर्चांतहि काटछाट करावी लागते. शिवाय आपला देश मागासलेला आहे. त्यामुळें जमेच्या रकमेचा अपुरेपणा हाहि ध्यानांत घ्यावा लागतो.

सामान्यपणें कोणत्याहि आर्थिक धोरणाचा स्वीकार करतांना देशांतील एकूण उत्पन्नाची व सर्वतऱ्हेच्या मागणीची मोजदाद घ्यावी लागते. याकरितां माहितीची आंकडेवारी जमा केली पाहिजे. आंकडेवारी जमा करण्याचें काम फार कठीण आहे. कारण, शास्त्रीय पद्धतीनें आंकडेवारी जमा करण्याचें काम आपल्याकडे रूढ व्हावयाचें आहे. म्हणूनच आज उपलब्ध असलेल्या आकडेवारीवर आपणांस विसंबतां येणार नाहीं. अशावेळीं, अंदाज घेत घेत, आर्थिक योजनेचा आराखडा तयार करणें शक्य आहे. पण याकरितांहि कांहीं प्रमाणांत विश्वसनीय आकडेवारीची मदत घ्यावीच लागते.

योजनेच्या ध्येयामुळें तिची दिशा ठरते व शिवाय योजनेमध्यें एक प्रेरक शक्ति निर्माण होते. ध्येयनिश्चितीमुळें योजनेच्या पूर्ततेकरितां किती कष्ट घ्यावे लागतील तें सूचित होतें. यामध्यें देशांतील कार्यशक्ति व ध्येयें यांची उत्तम सांगड घालतां आली पाहिजे. नाहींतर योजना म्हणजे एक साहस होईल.

सुधारलेल्या देशांतील योजनेचीं ध्येयें सतत बदलतीं असतात व त्यांचें मुख्य स्वरूप मेळ घालण्याचें असतें. मागासलेल्या देशांत ध्येयाचें स्वरूप फार व्यापक असावें लागतें. त्याचप्रमाणें ध्येयनिश्चिति करतांना फार बारीक-सारीक बाबतींत काटेकोर राहू नये. विशेषतः लोकशाहीप्रधान देशांत ध्येयनिश्चिति स्थूल स्वरूपांत करणें सोइस्कर. शिवाय, मागासलेल्या देशांत प्रगतीची गति मंद असल्यामुळें ध्येयपूर्तीचा काळ दीर्घ ठेवावा हें योग्य. सुसंबद्ध व सर्वव्यापी ध्येय असल्यानें योजनेंत ताकद निर्माण होते. मागासलेल्या देशांत क्रमाक्रमानें समृद्ध आर्थिक स्थितीकडे जाण्याचा प्रयत्न असतो. अशावेळीं वारंवार प्रगतीचा कानोसा घेत धोरणांत व ध्येयांत बदल करत जाणें हाच खरा योग्य व उपयुक्त मार्ग होय.

दूरगामी योजनेला समाजाच्या सद्यःस्थितीचा व बदलत्या स्थितीचा विचार केला पाहिजे व तसेंच त्याच्या व्यवहार्यतेचा नेहमीं विचार करणें आवश्यक आहे. याकरितांच योजनेची राजकीय उद्दिष्टांशीं व शासनसंस्थेच्या धारणेशीं उत्तम सांगड घालता आली पाहिजे. प्रगतपर देशांत आर्थिक स्थितीचें स्वरूप वेगानें बदलत असतें आणि याचा परिणाम म्हणून आर्थिक प्रगतीच्या सर्वोच्च स्थितीस पोंहचलेल्या देशासमोर नवीनच प्रश्न निर्माण झाले आहेत. पुढें काय ?

### आर्थिक योजनेंतील लोकशाही

सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे योजनेची शहानिशा करणें. लोकशाहीप्रधान देशांत योजनेच्या अंगोपांगांचा विचार होणें आवश्यक आहे. एखादा कायदा करतांना त्यावर जितका काथ्याकूट होतो तोच प्रकार येथेंहि असावा. यामुळें जनतेचें सहकार्यहि मिळेल व आपोआप लोकमताचें नियंत्रण आर्थिक सत्तेवर येईल.

सारांश, भारतामध्यें आपण नियोजनाची नुकतीच सुरवात केलेली आहे. त्या योजनांमधून जर आपण सातत्य ठेवूं शकलों व त्यांची लोकाभिमुख दिशा ठेवली तर तंत्र दृष्ट्या ती योग्य असल्यामुळें यशस्वी होईल.

—मा. द. आपटे

## सरदारगृह हीरकोत्सव

(८ एप्रिल, १९५८)

"सरदारगृहाला थोर परंपरा लाभलेली आहे. माणुसकी, सुजनता, अदबी, हे गुण राखून धंदा अधिकच चांगला करतां येतो, हें सरदारगृहानें आपल्या साठ वर्षांच्या इतिहासांत निखालसपणें सिद्ध केलेलें आहे आणि म्हणून त्याचा भविष्य-कालांतील उत्कर्षहि निश्चित स्वरूपाचा आहे याबद्दल मला शंका वाटत नाहीं."

मध्यप्रदेशाचे राज्यपाल श्री. हरीभाऊ पाटसकर यांनीं वरील शब्दांमध्यें आपली सरदारगृहाबद्दलची सद्भावना आपल्या अध्यक्षीय भाषणांत व्यक्त केली. सरदारगृहाच्या हीरकोत्सवाच्या सभेचे अध्यक्ष म्हणून ते भाषण करीत होते. आपल्या भाषणांत त्यांनीं स्वतः कायद्याचा अभ्यास लॉस्कूलमध्यें करीत असल्या-वेळेपासूनच्या आठवणी सांगितल्या. समारंभाला सुरुवात ब्रह्म-वृंदाच्या वेदोक्त आशीर्वचनांनीं झाली. त्यानंतर श्री. देशमुख यांनीं राज्यपाल श्रीप्रकाश, लोकनायक अणे, श्री. गंगाधरराव देशपांडे वगैरे मंडळींचे सदिच्छा संदेश वाचून दाखविले.

श्री. बापूसाहेब उपाध्ये यांनीं सर्वांचें स्वागत यथोचित शब्दांत केलें व सरदारगृहाची साठ वर्षांत कशी वाढ झाली याचें संक्षिप्तपणें दिग्दर्शन केलें.

श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. अण्णासाहेब काणे व श्री. माडखोलकर यांनीं अभिनंदनपर भाषणें केलीं व त्यामध्यें सरदारगृहाशीं असलेला आपला पूर्वापार संबंध कथन केला.

सरदारगृहाचे सर्वांत जुने आश्रयदाते म्हणून श्री. प्रतापशेट, श्री. माडखोलकर व श्री. तुळजापूरकर यांचा सन्मान करण्यांत आला. तसेंच बऱ्याच जुन्या नोकरांचाहि वस्त्रें व श्रीफळें देऊन सन्मान करण्यांत आला.

यानंतर श्री. पाटसकर यांचें अध्यक्षीय भाषण झालें. लो. टिळक व सरदारगृह यांचें साहचर्य एकाहि वक्त्याच्या भाषणांत उल्लेखिले गेल्या वांचून राहिलें नाहीं. तसेंच ते श्री. पाटसकरांच्या-हि भाषणांत उल्लेखिलें गेलें.

श्री. आत्मारामपंत भट यांनीं अध्यक्षांचे व सर्व पाहुण्यांचे आभार मानले. हजर असलेल्या मंडळींत मेयर मिरजकर, माजी मेयर दोंदे, सर रुस्तुम मसानी, न्या. गोखले, न्या. दीक्षित, डॉ. जिवराज मेहता, श्री. बाळासाहेब देसाई आणि इतर पुष्कळ प्रतिष्ठित नागरिक होते.

---

### नवीं वजनें व मापें

श्री. श्री. वा. काळे ह्यांचें 'नवीं वजनें व मापें' ह्या विषयावर दि. २७ एप्रिल, १९५८ रोजीं सायंकाळीं ७ वाजतां आकाश-वाणीच्या पुणें केंद्रावरून भाषण होणार आहे.


सरदारगृहाचा हीरकोत्सव

कृतज्ञता व आभार


आमच्या आश्रयदात्यांच्या शुभेच्छा व सहानुभूति यामुळेच सरदारगृहाच्या व्यवसायाला यंदा ६० वर्षे पूर्ण झाली.

नवीन सुधारणा

जनतेची सेवा चांगल्या रीतीनें करण्यासाठीं हीरकोत्सवानिमित्त आम्ही नवीन व अद्ययावत् सुखसोई केल्या आहेत.

टिळक स्मारक

"टिळक हॉल" मध्यें टिळक —जन्मशताब्दिदिनी आम्ही लोकमान्यांचे केलेले स्मारक प्रत्यहीं अनेक लोक पाहावयास येतात.



मुंबईतील मध्यवर्ती निवासस्थान


सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केट जवळ मुंबई २.

फोन नं. ३८३३७

तार 'सरदारगृह'

★ ★ ★ ★ ★



STUSA

मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठीं उत्तम ठिकाण



सासवड—बँकेची ही सहावी शाखा आपला रौप्यमहोत्सव साजरा करीत आहे.

या रौप्यमहोत्सवी सहा आणि इतर तेरा अशा एकूण १९ शाखांतून शेतकऱ्यांना स्वतःच्या पायावर उभें करण्याचें मूक कार्य अविरत चालूं असतें.

गेल्या चाळीस वर्षांच्या सेवेनें

'पुणें जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचें केंद्रस्थान'

—झालेली—

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

लक्ष्मी रस्ता, पुणें २.

* वसूल भाग भांडवल साडेसोळा लाखांचे वर.
* राखीव व इतर निधि साडेदहा लाखांचे वर.
* ठेवी दोन कोटींचे वर.
* खेळतें भांडवल तीन कोटींचे वर.
* पुणें, खेड, जुन्नर, मोर येथें सुरक्षित ठेवघरांची सोय.

बा. ग. अळतकर

कार्यकारी संचालक

## हातमाग कापडाच्या विक्रीवर आणखी खास सूट

### पडून राहिलेले सांठे उठविण्यासाठी केलेली उपाययोजना

१ डिसेंबर, १९५७ पासून हातमाग कापडाच्या विक्रीवरील सूट दीड आण्यांवरून ६ नव्या पैशांवर (व मुंबई राज्यांत २ आण्यांवरून ६ नव्या पैशांवर) आणण्यांत आली होती. हातमाग कापडाचा सांठा वाढत्या प्रमाणांत पडून राहत आहे व त्यामुळें निरनिराळ्या राज्यांतील विणकरांवर संकट गुदरलें आहे. विक्री वाढण्यासाठी व पडून राहिलेले सांठे उठविण्यासाठी हातमाग कापडाच्या विक्रीवर दर रुपयामागें ६ नये पैसे खास सूट देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ही खास सूट ११ एप्रिल १९५८ पासून दोन महिने मिळेल. एक रुपयावर नेहमीं देण्यांत येणाऱ्या ६ नये पैशांच्या सुटीखेरिज ही अधिक सूट देण्यांत आली आहे. विणकरांच्या सहकारी संस्था आणि सरकारी मालकीचे डेपो यांनीं केलेल्या किरकोळ विक्रीवर तसेंच विणकरांच्या सहकारी सोसायट्यांच्या घाऊक विक्रीवर ही सूट देण्यांत येईल.

---

### स्टेट बँक ऑफ इंडिया

(आंकडे लक्ष रुपयांचे)

| | १९५५ अखेर | १९५६ अखेर | १९५७ अखेर |
|---|---|---|---|
| १. 'डिमांड' देणीं | १६७,८९ | १७९,७८ | १९९,४१ |
| २. 'टाइम' देणीं | ३७,५० | ४१,७३ | १४४,८५ |
| ३. रोख शिल्लक | २,८८ | २,२६ | २,०७ |
| ४. रिझर्व्ह बँकेंत शिल्लक | १९,६२ | १२,६८ | २३,७५ |
| ५. सरकारी रोख्यांतील गुंतवणूक | १०५,०१ | ९२,६१ | १७०,४१ |
| ६. कर्जें | ८३,४५ | १०२,०२ | १४७,९८ |
| ७. खरीदलेलीं व डिस्कौंट केलेलीं अंतर्गत बिलें | १४,४६ | ३१,८६ | १५,०१ |
| ८. खरीदलेलीं व डिस्कौंट विदेशी बिलें | १,५६ | १,०८ | १,६१ |
| रिझर्व्ह बँकेकडून घेतलेलें कर्ज | ५,०० | ८,०० | नाहीं |

---

### सुती कापडाची निर्यात वाढली

सन १९५७ मध्यें भारतांतून ८८·९१ कोटि वार सुती कापडाची निर्यात झाली असावी, असा अंदाज आहे. १९५६ मध्यें झालेल्या सुती कापडाच्या निर्यातीपेक्षा ही निर्यात १४·५३ कोटि वारांनीं अधिक आहे. सन १९५७ मध्यें झालेल्या निर्यातीपासून ६४·१ कोटि रु. ची परकीय हुंडणावळ मिळाली. १९५६ मध्यें ५६·९९ कोटी रुपये परकीय हुंडणावळ मिळाली होती.

---

**भावनगर म्युनिसिपालिटीला मदत**—मुंबई सरकारनें भावनगर म्युनिसिपालिटीला २३ लक्ष रुपयांची मदत मंजूर केली आहे. ही मदत कर्जाऊ असून तिचा उपयोग शहराच्या हद्दींतील रस्ते सुधारण्यासाठी करण्यांत येणार आहे. मदतीचा हा दुसरा हप्ता आहे.


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
(स्थापना : १९११)

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४२,०८,०००
मुंबई सरकारतर्फे रु. ६६,००,०००
रु. १,०८,०८,०००

गंगाजळी व इतर फंड : रु. ६०,७६,०००
एकूण ठेवी : रु. ११,००,२६,०००
खेळतें भांडवल : रु. २०,५०,००,०००

११ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भोर स्टेट बँक लि.

[स्थापना : १९४४]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

अधिकृत भांडवल रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल रु. ५,००,०००
वसूल भांडवल रु. २,५०,०००
गंगाजळी व इतर फंडस् रु. ८५,५००

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.